# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ २८६५ /२०२४ पुणे दिनांक - १३/०१/२०२४

पुणे शहर चतुःश्रृंगी वाहतुक विभागामधील विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, पुणे शहरातील विद्यापीठ चौकातील वाहतूकीमध्ये प्रायोगीक तत्वावर खालील प्रमाणे बदल करत आहे.

❖ दिनांक १५/०१/२०२४ रोजी पासुन पुढिल आदेशापर्यंत प्रायोगिक तत्वावर वाहतूकीमध्ये बदल करण्यात येत आहे.

- शिवाजीनगरकडुन पुणे विद्यापीठाचे पुढे जाताना वाहन चालकांनी पाषाणकडे जाण्यासाठी चौकामधील पिलरचे अगोदर डाव्या बाजूच्या स्वतंत्र लेनचा वापर करावा.
- बाणेरकडे जाण्यासाठी बाणेर रोडचे डावे लेनमधुन जावे.
- पाषाणकडुन पुणे विद्यापीठ चौकाकडे येण्यासाठी पुर्वीप्रमाणेच अभिमानश्री सोसायटी जंक्शन पाषाण रोड येथुन डावीकडे वळण घेवून अभिमानश्री सोसायटी जंक्शन बाणेर रोडवरून उजवीकडे वळण घ्यावे.

13.1.24

(शशिकांत बोराटे)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर

प्रत:- सर्व संबंधीतांना